# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)

Registered PRGI NO - MAHMAR | 2015 | 63869

वर्ष-१३ * जानेवारी २०२६ * अंक - ७ * पृष्ठ संख्या - १८



स्काय आय मानस लेक संघ (फेडरेशन) स्थापनेसाठी मार्गदर्शन करताना
महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन - दि. २१ डिसेंबर २०२५



स्काय आय मानस लेक सह गृह संस्थांचा संघ स्थापण्यासाठी मार्गदर्शन
दि. २१ डिसेंबर २०२५ महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन,
व्यवस्थापक भीम बलकवडे आणि संस्थांचे पदाधिकारी.



मॅनेजर ट्रेनिंग १९ ते २१ डिसेंबर २०२५
महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप



मा. जिल्हाधिकारी यांच्याबरोबर मानीव अभिहस्तांतरणाबाबत बैठक दि. ३ डिसेंबर २०२५ – डावीकडून मा. जिल्हा उपनिबंधक (पुणे शहर) श्री. संजय राऊत, मा. जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डूडी (IAS), महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, मा. जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण) श्री. प्रकाश जगताप

मॅनेजर ट्रेनिंग १९ ते २१ डिसेंबर २०२५ च्या सहभागींना महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी आणि संचालक ॲड. मृद्गंधा जोशी यांच्या हस्ते सहकार मित्र म्हणून आयकार्ड दिले.






प्रतिकनगर फेडरेशनच्या पुनर्विकास संकल्पाच्या भूमिपूजनासाठी उपस्थित महासंघाचे संचालक आणि विकसक श्री. आदित्य जावडेकर – दि. १५ डिसेंबर २०२५

बिबवेवाडी, वर्धमानपुरा सोसायटी, मॅनेजर ट्रेनिंग बॅच सहभागींची अभ्यास भेट. दि. २४ डिसेंबर २०२५



# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)

संपादक : **सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर, पुणे - ४११०३०.

संपादन सहाय्य : **संचालक मंडळ**

**दूरभाष** : **०२०-२४४५४०१०**

**ई-मेल** : **punefed@gmail.com**

**वेबसाईट** : **www.punefed.com**

**यूट्यूब चॅनल** : **Pune District Housing Federation**

**इन्स्टाग्राम** : **instagram.com / maharashtrahousingfederation**



© : 'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे स्वाधीन



प्रकाशक : **श्री. सुहास केशव पटवर्धन**

मुद्रक : **श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस,** ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. भ्रमणध्वनी : ९८९००७३९४७


## अनुक्रमणिका


| क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय | ५ |
| २. | डिजिटल फुटप्रिंट आणि गोपनीयता | ६ |
| ३. | शंका समाधान | ८ |
| ४. | महासंघाचे सहकार दरबार | ९ |
| ५. | डिसेंबर २०२५ मधील महासंघाचे सभासद | १० |
| ६. | गरवारे बर्ड नेटचे फायदे | ११ |
| ७. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग माहिती व पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील | १२ |
| ८. | सुयोग ट्रेडर्स अभिप्राय | १३ |
| ९. | महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे | १४ |
| १०. | कुमार सबलाईम कार्यक्रम व मनपा निवडणूक | १५ |
| ११. | नियमित पान | १६ |
| १२. | संपूर्ण भारतातील आपत्कालीन हेल्पलाईन | १७ |



'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक श्री. सुहास केशव पटवर्धन यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक - **सुहास केशव पटवर्धन,** मुद्रण स्थान : **श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस - ९८९००७३९४७**


**_कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते._**



# ND2 CONSULTANCY PVT. LTD.

## AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY

**ND2 CONSULTANCY PVT. LTD**.is composed of a group of Experienced Structural Engineers, Architect, Civil Engineers, Fire Safety Engineers, Electrical Engineers, & Interior Designers.

We introduce ourselves as **Municipal Approved License Consulting Engineers & Contractors.**

### Our Services

- **Repair & Rehabilitation**
- **Structural Audit & Stability Report**
- **Structural Design of Steel Structures**
- **Civil Repair & Painting**
- **Architectural & Interior Designer**
- **Solar Power System**
- **Landscaping**

### Accreditation

ISO 9001:2015

IAF INTERNATIONAL ACCREDITATION FORUM

mms

EGAC Accredited

YOUR PROJECT PARTNER

"A dedication to technically challenging and practical solutions is central to ND2"

Contact Us For Details

+91-93269 64645 +91-99871 39465

**PUNE**

Office no. 408, 4th Floor, Fortune Business Centre, Wakad, Near Ambience Hotel, Pune -411057

**Mumbai**

Gorai Golden Sands CHSL, Shop no 7A, Nr HDFC Bank, Gorai Part 2, Borivali (W), Mumbai - 400091

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित

**punefed@gmail.com**

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

| | |
|---|---|
| कर्नल प्रमोद दहीतुले | ९९९९५३७४३२ |

## संपादकीय

२०२६ वर्ष सुरू झालं आहे. २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात अनेक नवीन योजना आणि धोरणं करण्यात आली. आता या वर्षात त्यावर प्रत्यक्ष काम करायचं आहे.

जानेवारी महिना म्हणजे आर्थिक वर्षाखेर होण्यापूर्वी संस्थेचे दफ्तर अद्ययावत करणे. लेखापरिक्षकांनी मागील वर्षीच्या अहवालात दिलेल्या शेऱ्यांवर काम करून संस्थेचे कामकाज अधिक पारदर्शी व नियमित करण्यावर समितीने भर द्यावा. महासंघातर्फे या वर्षात संस्थांनी हे कामकाज कसे केले आहे त्यावर आधारित आदर्श सह. गृह संस्था सन्मानित करणार आहोत. त्यासाठी संस्थेचे दफ्तर तसेच पर्यावरण पूरक उपक्रम यावर भर दिलेल्या संस्थांना प्रोत्साहन देण्यात येईल.

या स्पर्धेचे निकष लवकरच महासंघामार्फत आपल्या संस्थांपर्यंत पोहोचतील, तरी सीमिती सदस्यांनी आपल्या संस्थेला पारितोषिक मिळावे यासाठी प्रयत्न करावा.

आदर्श संस्था म्हणजे सर्वांच्या सहभागाने अधिक क्रियाशील असणारी संस्था. चला तर मग आपण सर्वजण मिळून आपली संस्था आदर्श बनवूया.

**– मनीषा विजय कोष्टी**

**सचिव**

***

**वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ✻ GST सह**

| | ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट | सिंगल कलर | फोर कलर |
|---|---|---|---|
| १/३ पान | २,३६०/- | - | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | ४,७२०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | ५,९००/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | - | २३,६००/- |

✻ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

✻ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

# डिजिटल फुटप्रिंट आणि गोपनीयता

**भा**रतीय लोकांचे जगणे सुसह्य करण्यासाठी (Ease of living) भारत देश हा Digital economy मध्ये दिवसेंदिवस प्रगती करत आहे.

डिजिटलायझेशनने भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, digital अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये ecommerce व डिजिटल व्यापाराची पाळे मुळे आता चांगलीच जोम धरू लागली आहेत. यासाठीचे आवश्यक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजेच हार्डवेअर, सॉफ्टवेअर, high speed internet service इ. उपलब्ध करून देणे हा भारत सरकारच्या डिजिटल अर्थकारण योजनेचा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे. डिजिटल infratructure हा digital अर्थकारणाचा कणा आहे.

* **डिजिटल अर्थव्यवस्था वाढ :** २०१४ ते २०१९ या कालावधीत भारताची मुख्य डिजिटल अर्थव्यवस्था एकूण अर्थव्यवस्थेपेक्षा २.४ पट अधिक वेगाने वाढली. या यशामुळे भारत सरकारने सदर संरचनेची व्याप्ती व जनतेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने डिजिटल पब्लिक infrastructure (DPI) विकसित करण्यावर जोर दिला आहे, ज्यामुळे खालीलप्रमाणे प्लॅटफॉर्म तयार झाले आहेत :

१) **आधार :** विशेष /युनिक ओळख प्लॅटफॉर्म

२) **UPI :** पेमेंट प्रणाली

३) **Co-Win :** लसी व्यवस्थापन प्लॅटफॉर्म

४) **Digi Locker :** डिजिटल दस्तऐवज संचय प्लॅटफॉर्म

५) **Diksha :** शैक्षणिक प्लॅटफॉर्म

६) **डिजिटल व्यापकता :** वाढलेल्या डिजिटल व्यापकतेमुळे अर्थव्यवस्थेत सूत्रबद्धता आली आहे.

* **डिजिटल वातावरण :** भारतात मुक्त आणि डिजिटल innovation चे वातावरण आहे, सरकार व आयटी उद्योग एकमेकांच्या सहकार्याने उपक्रम करत आहेत.

* **Data collection, Data sharing, Data Processing** डिजिटाईझशन अथवा पब्लिक डिजिटल प्लॅटफॉर्म करिता डेटा ही अत्यावश्यक बाब आहे. डिजिटल सेवा देण्यासाठी व्यक्तीची व्यक्तिगत माहिती मिळणे जरुरीचे आहे आणि इथून सुरू होतो समस्यांचा प्रवास. सदर माहितीची इतरत्र देवाण घेवाण झाल्यास अथवा ती सामायिक झाल्यास त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते व त्याचे परिणाम गंभीर होऊ शकतात.

* **के. एस.पुट्टू स्वामी सर्वोच्च न्यायालयीन प्रकरण २०१७**

सदर प्रकरणामध्ये कर्नाटक उच्च न्यायालयाचे निवृत न्यायाधीश यांनी आधार कायद्यानुसार सरकारने UID-I अनिवार्य केल्याने स्वतःचा गोपनीयतेचा (Right to privacy) अधिकार भंग होत असल्याचे सांगून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सदर अधिकार राज्य घटनेनुसार मूलभूत अधिकार असल्याचे नमूद केले. UID-I चे बारा अंकी कार्ड तयार करताना बायोग्राफिक व डेमोग्राफिक असा वैयक्तिक तपशील तसेच बायोमेट्रिक्स ही घेत असल्याने व ही माहिती सरकारच्या इतर खात्याना पुरवली जाणार असल्याने त्याचा दुरुपयोग होऊ शकतो या कारणास्तव आधार कायदा रद्द करण्यात यावा अशी मागणी केली. सर्वोच्च न्यायालयाने Right to privacy हा घटनेच्या आर्टिकल २१ नुसार मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले; परंतु काही कलमे रद्द करण्याचे निर्देश देऊन आधार कायदा वैध असल्याचा निर्णय दिला.

सदर निकालानंतर गोपनीयतेची बाब अधिक गंभीरतेने घेऊन सरकार ने २०२३ मध्ये Digital Protection Data Personal Act हा कायदा पारित केला.

हा कायदा भारताचा पहिला सर्वसमावेशक डेटा संरक्षण कायदा आहे कायद्याच्या तरतुदी समजून घेण्यासाठी कंपन्यांना दोन वर्षाची मुदत दिलेली आहे. २०२७ साल पासून हा कायदा लागू होण्याची शक्यता आहे. सदर कायद्याच्या नियमांचा मसुदा २०२५ मध्ये आलेला आहे सदर नियमांना अजून अंतिम स्वरूप मिळायचे आहे.

* **सदर कायद्याचे स्वरूप समजून घेऊयात.**

१. सदर कायदा बनविताना युरोपियन (जी डी पी आर) युरोपियन युनियन जनरल डाटा प्रोटेक्शन रेगुलेशन व कॅलिफोर्नियाच्या कायद्याची(सी सी पी ए) कॅलिफोर्निया कंझ्यूमर प्रायव्हसी ॲक्ट ची मदत घेतली आहे.

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट (DPDPA) ह्या कायद्याचे मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत :

२. लागूक्षेत्र : DPDPA भारतात आणि भारताबाहेर डिजिटल वैयक्तिक डेटा प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना लागू होते, जर प्रक्रिया भारतातील व्यक्तींना वस्तू किंवा सेवा देण्याशी संबंधित असेल.

३. तीन पार्टीचा यामध्ये समावेश असेल i) डेटा प्रिन्सिपल

(Data principal) ज्या व्यक्तीचा डेटा घेतला असेल ती व्यक्ती ii) डेटा फायडूशियरी (Data fiduciary) ज्या कंपनीने डेटा घेतला असेल ती कंपनी iii) डेटा प्रोसेसर (Data Processor) फायडूशेरी कंपनीने ज्या कंपनीना डेटा प्रोसेस करायला पाठवला असेल ती कंपनी

४. डेटा प्रिन्सिपल्सचे अधिकार : डेटा प्रिन्सिपल्सना त्यांच्या वैयक्तिक डेटाच्या प्रक्रियेबद्दल माहिती मिळण्याचा, त्यामध्ये प्रवेश मिळविण्याचा, सुधारणा करण्याचा, मिटविण्याचा, प्रक्रियेला विरोध आणि प्रतिबंध करण्याचा अधिकार आहे. डेटा प्रिन्सिपल्सना डेटा कोणत्या हेतूसाठी गोळा केला जात आहे आणि त्याची व्याप्ती काय आहे याबद्दल माहिती दिली पाहिजे. व त्यासाठी त्यांची स्पष्ट व बिनशर्त संमती असणे आवश्यक आहे. डेटा प्रिंसिपलना आपला नॉमिनी नेमण्याचा अधिकार आहे.

५. डेटा (fiduciary) विश्वस्तच्या जबाबदाऱ्या :-

i) डेटा प्रोटेक्शन ऑफिसर (DPO) ची नेमणूक जो भारतात राहतो आणि DPDPA चे पालन सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार आहे.

ii) सहमती व्यवस्थापकाची नियुक्ती :- कंपन्यांनी एक संमती व्यवस्थापक नियुक्त करणे किंवा डेटा प्रिन्सिपल्सना नोंदणीकृत संमती व्यवस्थापक नामांकित करण्याचा पर्याय प्रदान करणे आवश्यक आहे.

६) दंड : पालन न केल्यास INR ५०० दशलक्ष ते INR २.५ अब्ज (अंदाजे ५ दशलक्ष ते २९.६ दशलक्ष) इतक्या मोठ्या रकमेपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

७) आंतरराष्ट्रीय डेटा हस्तांतरण * : DPDPA भारतीय सरकारला देशांची यादी प्रकाशित करण्याचा अधिकार देते ज्यांना डेटा हस्तांतरण पूर्णपणे प्रतिबंधित आहे. म्हणजेच आपल्या शत्रू राष्ट्राना किंवा आपले हितसंबंध धोक्यात येतील अशा देशाना ब्लॅक लिस्ट करू शकतो.

८) सध्याच्या धोरणांचे पुनरावलोकन करणे, DPDPA चे पालन सुनिश्चित करण्यासाठी स्वतःची धोरणे आणि पद्धती अद्ययावत करणे.

DPDPA मध्ये कोणतेही शेवटच्या क्षणी बदल झाल्यास त्यावर लक्ष ठेवणे आणि त्यानुसार अनुपालन करण्यासाठी धोरणे समायोजित करणे या सर्व जबाबदाऱ्यांचे पालन fiduciary कंपन्यानी करावयाचे आहे.

९) सरकारचे अधिकार : माहिती (डेटा ) गोळा करताना लोकांकडून संमती घेणे सरकार वर बंधनकारक नाही.

आज रोजी भारतात अनेक कंपन्या उदा. gmail, amazon, online form भरणे, you tube, google ह्या लोकांकडून वैयक्तिक माहिती घेत असतात. आपले संपूर्ण नाव, आपल्या नातलगांची नावे, जन्मतारीख, लग्नाची तारीख अशी अद्ययावत माहिती सर्वदूर पोचली आहेच. Google क्लाऊड मध्ये साठवली आहे. या व्यतिरिक्त आपल्या रोजच्या जीवनात आपण काही माहिती देतं असतो उदा. कपडे खरेदी झाल्यावर दुकानदार आपल्याला फोन नंबर विचारतो, त्यानंतर आपल्या नंबरवर एखाद्या marketing कंपनी चा फोन येऊन त्यांच्या विषयी माहिती दिली जाते. हा डेटा leakage चा प्रकार आहे. हे उदाहरण छोटे आहे; परंतु काही महत्वाचे बाबतीत वरील कायद्याच्या तरतुदीमुळे सदर माहितीचा दुरुपयोग टळेल.

*** भारतातील इतर अनुषंगिक (डेटा संरक्षण) कायदे :-**

Information and Technology Act 2000 (सुधारणा २००८)

आयटी कायदा हा सायबर सुरक्षा आणि इलेक्ट्रॉनिक व्यवहारांना व्यापणारा एक व्यापक कायदा आहे, जो पूर्वी भारतात डेटा संरक्षणासाठी मुख्य कायदेशीर आधार होता; परंतु त्याची व्याप्ती नवीन कायद्याइतकी नाही.

DPDP कायदा हा एक व्यापक, आधुनिक, डेटा संरक्षण कायदा आहे. आयटी कायदा आणि SPDI (Information Technology Reasonable Security Practices and Procedure and Sensitive personal data or informations rules 2011) नियमांच्या काही भागांची जागा या नवीन कायद्याने घेतली आहे. हा कायदा विशेषतः डिजिटल वैयक्तिक डेटावर लक्ष केंद्रित करतो ज्यामध्ये अधिक विशिष्ट तरतुदी, व्यक्तींसाठी अधिकार आणि डेटा संरक्षण उल्लंघनांसाठी उच्च दंड अशा तरतुदीचा समावेश आहे.

विशेषतः डिजिटल वैयक्तिक डेटाच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करते. सदर कायदा जागतिक मानकांशी सुसंगत आहे.

**डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी आपण हा नवीन कायदा समजून घेऊ व त्याचे मनःपूर्वक स्वागत करूयात.**

(कायद्याच्या नाविन्यामुळे व स्वरूपामुळे इंग्रजीचा वापर अपरिहार्य आहे.)

***

**- ॲड. मृद्गंधा जोशी**
संचालक
द्वारका, सहकारनगर क्र. १,
पुणे - ४११००९.
भ्रमणभाष - ८७६६४३२७६९

# शंका-समाधान

**१. संस्थेच्या सभासदाऐवजी त्याच्या कुटुंबातील व्यक्ती समितीची निवडणूक लढवू शकते का?**

**उत्तर –** हो. संस्थेचा सदस्य (भाग पत्रावरील प्रथम नाव असलेली व्यक्ती) जर निवडणूकीत/सर्वसाधारण सभेत भाग घेणार नसेल, तर नवीन सहकार कायदा दुरुस्ती २०१९ च्या १५४ ब मधील १८(अ) सहयोगी सदस्य किंवा १८(ब) सह सदस्य भाग घेऊ शकेल. त्यासाठी मूळ सदस्याने संस्थेकडे विहित नमुन्यात (परिशिष्ट क्र. ५ नुसार) अर्ज करून संस्थेने त्याला मंजूरी देणे आवश्यक आहे.

**सहयोगी सदस्य :** एखाद्या सदस्याच्या लेखी शिफारशींवरून त्याच्या लेखी पूर्व संमतीने त्याच्या हक्क व कर्तव्यांचा वापर करण्यासाठी, जिला गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यकुलात यथोचितरित्या दाखल करून घेतलेले असेल आणि भागपत्रामध्ये तिचे नाव नसेल अशी कोणतीही व्यक्ती म्हणजे पती, पत्नी, माता, पिता, भाऊ, बहिण, मुलगा, जावई, सून, पुतण्या, पुतणी असा आहे.

**सह सदस्य :** याचा अर्थ ज्याच्या परिणामी एखाद्या गृहनिर्माण संस्थेची नोंदणी झालेली असेल अशा त्या गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी अर्जात नाव अंतर्भूत असणारी व्यक्ती किंवा गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीनंतर तिला तिच्या सदस्य कुलात सदस्यत्वासाठी यथोचितरित्या दाखल करून घेण्यात आले असेल आणि जी सदनिकेमध्ये हिस्सा, हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंधन धारण करीत असेल; परंतु भागपत्रात जिचे नाव प्रथम स्थानी नसेल अशी व्यक्ती.

**२. एखाद्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्याची प्रक्रिया काय असते?**

**उत्तर –** एखाद्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करायचे असेल तर त्याचे कारण नमूद करून सभासदाला कारणे दाखवा नोटीस पाठवून त्याचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी. त्याने जर काहीही खुलासा केला नाही, तर एक महिन्याने विशेष सर्वसाधारण सभा बोलावून विषयपत्रिकेत सभासदत्व रद्द करण्याचा विषय घ्यावा. सभेमध्ये उपस्थित असलेल्या सभासदांपैकी कमीत कमी तीन चतुर्थांश बहुमताने सभासदाला काढून टाकण्याचा ठराव मान्य होणे आवश्यक आहे. सदर ठराव उपनिबंधकांकडे मान्यतेसाठी पाठवणे आवश्यक आहे. निबंधक त्याला नोटीस देऊन सुनावणीची संधी देऊन योग्य वाटल्यास मान्यता देतील व सदस्यत्व रद्द होईल.

सदस्यत्व रद्द झाल्यानंतर त्या सदस्याला संस्थेच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहाता येणार नाही. तसेच निवडणूकीतही भाग घेता येणार नाही.

**३. सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये सुविधांचा वापर व देखभाल करण्यासाठी प्रत्येक सभासदाकडून महिना ठरावीक रक्कम देखभाल वर्गणी घेत असते. संस्थेच्या सभासदांनी नियमितपणे आवश्यक रक्कम संस्थेकडे जमा केली नाही तर काय कारवाई करता येईल?**

**उत्तर –** संस्थेचे पदाधिकारी याबाबत संबंधित सदस्यांना सूचना पाठवूनही आवश्यक रक्कम भरत नाहीत. अशा परिस्थितीत संस्था नियम १५४ब २९ नुसार उपनिबंधांकडे सदर रक्कम वसुलीसाठी दावा दाखल करू शकते. याबाबत आवश्यक चौकशी झाल्यावर उपनिबंधक वसुलीचा आदेश देतात. संस्थेला असा वसुली दाखला मिळाल्यावर संस्थेने महासंघाकडे वसुली करण्यासाठी अर्ज करावा. त्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्रे महासंघाकडे द्यावीत.

१) महासंघाचे सभासदत्व आवश्यक

२) संस्थेच्या कार्यकारिणीचा ठराव – महासंघाच्या वसुली अधिकाऱ्याची नेमणूक

३) वसुली दाखला – एक प्रत

४) महासंघाच्या नावे दोन चेक – (अ) वसुली रकमेच्या ४.५% (प्रोसेसिंग फी व आदेशिका फी) (ब) वसुलीच्या रकमेच्या १% (लिलावाच्या)

५) संस्थेच्या थकबाकीदारकाची माहिती – , बँक खाते क्र.

६) संस्थेने निश्चित केलेला व्याजदर (ठराव)

७) वसुली दाव्यासोबत सादर केलेल्या थकबाकीदाराचा खाते उतारा.

८) महासंघाकडे उर्वरीत कागदपत्रे दाखल केल्यावर महासंघाचे वसुली अधिकारी पुढील कारवाई चालू करतात आणि संस्थेची थकबाकी वसूल करून देतात.

**– मनीषा कोष्टी**
सचिव

***

## मानीव अभिहस्तांतरणा संदर्भात बैठक

माननीय जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, IAS, पुणे, यांचेबरोबर श्री. सुहास पटवर्धन, अध्यक्ष, पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, श्री. संजय राऊत जिल्हा उपनिबंधक, पूणे शहर, श्री. प्रकाश जगताप जिल्हा उपनिबंधक, पुणे ग्रामीण यांची मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात बैठक ३ डिसेंबर २०२५ या दिवशी झाली.

त्यांनी लगेच २/३ आदेश दिले, बैठक नियमितपणे आयोजित करण्यात यावी, नवीन संस्थांचे अभिहस्तांतर प्रकिया ४ महिन्यानंतर चालू करावी, सहाय्यक दुय्यम निबंधक अधिकारी या कामासाठी नेमावेत, प्रशासन आणि जिल्हा, राज्य महासंघाने समन्वय साधावा. इ.

## मॅनेजर ट्रेनिंग

मॅनेजर ट्रेनिंग बॅचमधील ११ सहभागींना सहकार मित्र I-cards आणि authority letter महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी आणि संचालक ॲड. मृद्गंधा जोशी यांच्या हस्ते देण्यात आले. सर्वजण फेडरेशनसोबत काम करणार आहेत.

मॅनेजर ट्रेनिंग बॅचसाठी वर्धमानपुरा सह. गृह संस्था, बिबवेवाडी येथे, २४ डिसेंबर २०२५ या दिवशी अभ्यास भेट आयोजित करण्यात आली. संस्थेने सर्व दफ्तर दाखवून, आवारातील पर्यावरण पूरक उपक्रमांची पाहणी केली, सुग्रास भोजनाची व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात आली. संस्थेचे सचिव श्री. देवीचंद संघवी तसेच कोषाध्यक्ष श्री. अनिल पोरवाल यावेळी उपस्थित होते. अध्यक्ष श्री. हर्षद लोढा यांचे महासंघातर्फे आभार.

## : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी–४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे–२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे–३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे–३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०–२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे–३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे–४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर–१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे–०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई–६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे – ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **विश्रांतवाडी –** कस्तुरबा सह. गृह संस्था, पुणे | **श्री. प्रकाश तोंडारे** | ९७६३६०३३८४ |
| १२. | **हिंजवडी –** यशवन सोसायटी, हिंजवडी,VJ एव्हेन्यू जवळ, माण रस्ता | पहिला शनिवार<br>**श्री. चारूहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |

## डिसेंबर २०२५ मध्ये एकूण २९ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **श्रीनिवास ग्रीनलॅन्ड काउंटी सह. गृह. संस्था, मर्या.,** नऱ्हे, पुणे ४११०४१.

२) **तनिष पार्क आय विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** चऱ्होली बु., पुणे ४१२१०५.

३) **अलंकापुरी बी सह. गृह. संस्था, मर्या.,** वडगाव खुर्द, पुणे ४११०४१.

४) **गणेशप्रभा सह. गृह. संस्था, मर्या.,** धनकवडी, पुणे ४११०४३.

५) **लावेनटाना सह. गृह. संस्था, मर्या.,** कोंढवा खु., पुणे ४११०४८.

६) **ॲरीस्टोलीया विंग-ए, विंग-बी, विंग-सी सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

७) **एफ रेसिडेंसेस टॉवर ५, ६, ७ विंग-१ सह. गृह. संस्था, मर्या.,**वडगावशेरी, पुणे ४११०१४.

८) **विनायक अपार्टमेंट सह. गृह. संस्था, मर्या.,** पर्वती, पुणे ४११००९.

९) **वन नेशन सह. गृह. संस्था मर्या.,** पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७.

१०) **कुमार पेबल पार्क ए-१ बिल्डिंग सह. गृह. संस्था मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

११) **सावित्री अपार्टमेंट सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

१२) **साईविश्व सह. गृह. संस्था, मर्या.,** मौजे सुदुंबरे, पुणे ४१२१०९.

१३) **डॅफोडिल्स फेज-१ सी सह. गृह. संस्था, मर्या.,** सोमाटणे, पुणे ४१०५०६.

१४) **डॅफोडिल्स फेज-१ बी सह. गृह. संस्था, मर्या.,** सोमाटणे, पुणे ४१०५०६.

१५) **गौतम गंधार सह. गृह. संस्था, मर्या.,** लोहगाव, पुणे ४११०१४.

१६) **मेगा पॉलिस मिस्टिक सह. गृह. संस्था, मर्या.,** हिंजवडी, पुणे ४११०५७.

१७) **व्हीटीपी अलपाईन सह. गृह. संस्था, मर्या.,** म्हाळुंगे, पुणे ४११०४५.

१८) **गोवर्धन हिल्स देखभाल सह. गृह. संस्था, मर्या.,** पुरंदर, पुणे ४१२३०१.

१९) **कुमार प्रॉस्पेरा सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

२०) **गॅलेक्सी वन सह. गृह. संस्था, मर्या.,** खराडी, पुणे ४११०१४.

२१) **स्वामी संकुल सह. गृह. संस्था, मर्या.,** सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

२२) **विघ्नहर्ता हेरिटेज बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** आंबेगाव, पुणे ४११०४६.

२३) **व्हीटीपी लिओनारा सह. गृह. संस्था, मर्या.,** म्हाळुंगे, पुणे ४११०४५.

२४) **इऑन होम्स डी-१ सह. गृह. संस्था, मर्या.,** माण, मुळशी, पुणे ४११०५७.

२५) **स्कायवर्डस् निर्वाणा सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

२६) **गंगा लिजेंड बिल्डिंग नं. बी २ सह. गृह. संस्था, मर्या.,** बावधन, पुणे ४११०२१.

२७) **द्वारीका धाम टॉवर नं. ३ सह. गृह. संस्था, मर्या.,** कोंढवा बु., पुणे ४११०४८.

२८) **श्री समर्थ सह. गृह. संस्था, मर्या.,** बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

२९) **द रिव्हर नेस्ट सह. गृह. संस्था, मर्या.,** दत्तवाडी, पुणे ४११००९.

***

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्मस, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस्, पावती पुस्तके, व्हाऊचर्स याची योग्य दरात विक्री महासंघाच्या कार्यालयातून स. १०:३० ते ५:३० या वेळेत करण्यात येते.**

# गरवारे बर्ड नेटचे फायदे (संरक्षण व स्वच्छता)

**प्रभावी पक्षी प्रतिबंध :**

बाल्कनी, खिडक्या, टेरेस व मोकळ्या जागांमध्ये पक्ष्यांना प्रवेश मिळू न देता त्यांचे घरटे बांधणे, बसणे व घाण करणे थांबवते.

**स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण :**

पक्ष्यांची विष्ठा, पिसे व कचरा यामुळे होणारे आजार व किटकांचा त्रास टाळून परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवते.

**टिकाऊ व हवामान प्रतिरोधक :**

उच्च दर्जाच्या HDPE साहित्यापासून बनवलेले व UVA स्टॅबिलायइड असल्याने ऊन-पावसातही दीर्घकाळ टिकते.

**मानवतावादी व पर्यावरणपूरक :**

पक्ष्यांना कोणतीही इजा न करता, विषमुक्त पद्धतीने संरक्षण देते तसेच हवा व प्रकाश अडथळ्याविना येऊ देते.

**कमी देखभाल खर्च :**

एकदा योग्य प्रकारे बसवल्यानंतर फारशी देखभाल लागत नाही.

**अदृश्य सेफ्टी ग्रिल्सचे फायदे (सुरक्षा व सौंदर्य)**

**अडथळामुक्त दृश्य :**

उच्च ताणक्षमता असलेल्या स्टेनलेस स्टील वायरमुळे जवळजवळ अदृश्य संरक्षण मिळते.

**भक्कम सुरक्षा :**

बाल्कनी व खिडक्यांमधून पडण्याचा धोका टाळून लहान मुले, पाळीव प्राणी व रहिवाशांचे संरक्षण करते.

**आधुनिक व आकर्षक डिझाइन :**

पारंपरिक जड लोखंडी गजांऐवजी आधुनिक इमारतींच्या रचनेत सहज मिसळते.

**गंजरोधक व दीर्घकाळ टिकणारी :**

उच्च दर्जाच्या साहित्यामुळे मजबूत, सुरक्षित व दीर्घायुषी ठरते.

संयुक्त फायदे (बर्ड नेट + अदृश्य सेफ्टी ग्रिल)

**दुहेरी संरक्षण :**

बर्ड नेट पक्ष्यांपासून संरक्षण देते, तर अदृश्य सेफ्टी ग्रिल सुरक्षिततेची खात्री देते.

**उत्तम राहणीमान :**

उंच इमारती व शहरी घरांसाठी स्वच्छ, सुरक्षित व सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण करून मनःशांती देते.

***

**– अभिजीत कुलकर्णी**
(सहकार मित्र)
भ्रमणभाष – ८८८८७२३४५



# ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

**सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –**

**टोल फ्रि क्रमांक – 1064**

दूरध्वनी क्रमांक : **(1) 020 - 26132802**
**(2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**
**Mobile App - www.acbmaharashtra.net**

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

**भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.**

**कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत असल्यास संपर्क साधा**

**तर करा फक्त एक फोन 1064 किंवा 403781064**

दूरध्वनी क्रमांक : **(1) 020 - 26132802 | (2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**


## पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महीन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांच्या सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

१) ढोले पाटील रोड – ०२० २५५९७३९४
२) येरवडा – कळस धानोरी – ०२० २५५०९१००
३) नगर रोड, वडगाव शेरी – ०२० २५५०९०००
४) शिवाजीनगर – घोले रोड – ०२० २५५०१५००
५) कोथरुड – बावधन – ०२० २५५०१६००
६) औंध – बाणेर – ०२० २५५०९७१०
७) धनकवडी – सहकारनगर – ०२० २५५०८९०४
८) वारजे कर्वेनगर – ०२० २५५५९७७०
९) सिंहगड रोड – ०२० २५५०८२००
१०) कोंढवा-येवलेवाडी – ०२० २५५०८८००
११) हडपसर – मुंढवा – ०२० २५५९७४००
१२) वानवडी – रामटेकडी – ०२० २५५९७४००
१३) कसबा – विश्रामबागवाडा – ०२० २५५९७६००
१४) भवानी पेठ – ०२० २५५०७२००
१५) बिबवेवाडी – ०२० २५५०८७००

***

# सुयोग ट्रेडर्स-स्कुल शॉपी

**मी** दिपक जंगम (स्कूल शॉपी - चिंचवड) आपणास कळविण्यास आनंद वाटत आहे की, सदर आपल्या स्कूल शॉपी या विक्री केंद्रास जानेवारी २०२६ मध्ये ११ वर्षे पूर्ण होत आहेत. आपण मला स्कूलशॉपी विक्री केंद्राच्या माध्यमातून फेडरेशन समवेत काम करण्याची सुवर्णसंधी दिलीत व आपल्या सहकार्यामुळे सदर काम करू शकलो त्याबद्दल मी आपणा सर्वांचा व आपल्या सर्व सहकाऱ्यांचा ऋणी आहे व त्याबद्दल आपणा सर्वांचा आभारी आहे.

विक्री केंद्र चालविताना महासंघाचे फॉर्मस्, रजिस्टर, बायलॉज यांची विक्री करतानाच खालीलप्रमाणे अनेक उपक्रम राबविले.

१) गृहसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांना बायलॉज, फॉर्मस्, रजिस्टर्स यांची माहिती देणे.

२) फेडरेशनची माहिती देणे व फेडिरेशनचे सभासदत्व स्वीकारण्यास सांगणे.

३) गृहसंस्थांच्या अडचणींसंबंधी दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी आपण घेत असलेल्या सहकार दरबारची माहिती देणे व कर्णिकसाहेबांशी संपर्क साधण्यास सांगणे.

४) गृहसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांना, मॅनेजर यांसाठी आपण देत असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती देणे.

५) सध्या रिडेव्हलपमेंट संबंधी चौकशी होत आहे त्यासाठी सोसायटी कन्व्हेयन्स / डीम्ड कन्व्हेयन्स संबंधी माहिती देऊन सहकार दरबारमध्ये उपस्थित राहाण्यास सांगणे.

६) सेल्फ-रिडेव्हलपमेंट संदर्भात माहिती देऊन मा. पटवर्धन साहेब यांच्याशी संपर्क साधण्यास सांगणे. या संदर्भात विलेपार्ले येथील नंदादीप हौसिंग सोसायटीची माहिती देणे.

७) देखभाल खर्च - थकबाकी संदर्भात फेडरेशनचे सभासदत्व घेऊन फेडरेशनच्या वसूली अधिकारी संदर्भात माहिती देणे.

८) निवडणूक संदर्भात माहिती देवून फेडरेशनच्या निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करून घेणेस सांगणे.

फेडरेशनचे पदाधिकारी श्री. सुहास पटवर्धन, श्री. कर्णिक, सौ. मनिषा कोष्टी यांचा मी आभारी आहे.

**- श्री. दिपक जंगम**
सुयोग ट्रेडर्स-स्कुल शॉपी,
चाफेकर चौक, चिंचवड गाव, पुणे

***


*With Best Compliments From*

KBPCIVIL
ENGINEERING SERVICES

**PMC/PCMC/Government Approved Structural Auditor**

An ISO/iec 17025:2017 nabl accrediated laboratory

**KBP Civil Engineering Services Pvt. Ltd.**

Address : E2, Manali Arcade, Near D. Mart, Pune-Satara Road, Padmavati, Pune-411041

**Contact : 9226054262 / 8888226688**

**Email Id :** marketing@kbpcivil.in | **Website :** www.kbpengineers.com

*- OTHER SERVICES -*

1. Structural Audit & Stability Certification.
2. RCC & Steel Design.
3. Repair & Retrofitting Consultant.
4. Architectural Design
5. Estimation & Costing (As per RERA)
6. Property Valuation.
7. Construction Quality Audit.
8. Non Destructive Testing.

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस् पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

***जानेवारी २०२५ पासून वास्तूदर्शन अंक पोस्टाऐवजी डीजिटल स्वरूपात व्हॉट्सअ‍ॅप, ईमेल द्वारे सभासदांना पाठवत आहोत. त्यासाठी सर्वांनी व्हॉट्सअ‍ॅप नंबर तसेच ई–मेल आयडी महासंघाकडे पाठवावेत ही विनंती.***

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- **१. स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- **२. श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- **३. निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- **४. सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- **५. प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- **६. सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- **७. मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- **८. स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- **९. पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- **१०. द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- **११. कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- **१२. सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- **१३. शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५
- **१४. चैतन्य पुरंदरे –** विश्वगंगा कॉम्प्लेक्स, संतोष हॉलजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे – ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०

## Student Co- Operative Investiture Ceremony at Kumar Sublime CHSL

United nations declared year 2025 as International year of co-operative with a theme "co-operative Build a better world." The Pune district co-operative Housing Societies and apartments Federation Limited closed the co-operative year 2025 on high note with celebration of Student co-operative Investiture ceremony in its member society, Kumar sublime co-operative housing society limited, Kondwa Khurd, Pune on 27th Dec 2025.

"Kumar Sublime co-opeartive Housing Society is located in Kondwa Khurd Pune. It is the most eco friendly housing society and recipients of many Awards, Appereciation ceretificates and accolodes. society is in the forefront in implemating many eco friendly initiatives. Stressing on use of solar energy, wind energy and Renewale energy. The innvestiture ceremany was held in the gracious presence of Mr. Suhas Patwardhan - Chairman of Maharashtra state co-operative Housing societies and apartments Federation and graced by Adv. Mrudgandha Joshi, Mr. Rajendra Prasade Directors of Pune Federation, Dr. Sagar Kisan Wadkar - Founder Pritivi Mitra Multistate co-operative Society and Mr. Sunil Jagtap - Officer Maharashtra Rajya Sahakari shikshan Mahasangh Pune. “The Students were administrated co-operative oath by Adv. Murdgandha Joshi - Director, Pune Federation. "The Student Co-operative reinforced key co-operative principles of team work, Democracy, Equality, mutual help and shared responsibility. Guiding them to play impactful leadership roles in co-operative. This investiture ceremony marked the clouser of international co-op. year 2025 on strengthening student community.

**- Avelino Noronha**
"Secertary - Kumar Sublime CHSL"
Director - Pune Federation

***

## महानगरपालिका निवडणूक

**पु**णे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १५ जानेवारी २०२६ या तारखेस होऊ घातलेल्या निवडणूकेचे बिगूल वाजले आणि त्याचे पडघम आपणास जाणवत असेलच.

पुण्याचे नागरीक जागृक, सूज्ञ आहेत. त्यांना आपल्या अधिकाराची आणि कर्तव्याची जाणीव आहे. त्या प्रमाणे या निवडणूकीतील विविध उमेदवारास ते आपला मतदानाचा अधिकार बजावून मतदान करतील व योग्य तो उमेदवार निवडून आणतीलच.

पुणे महासंघ मधून आम्ही आपणास आवाहन करतो की हे मतदानाचे हक्क बजावून मतदान आवश्य करा. त्याचबरोबर आपल्या आजूबाजूस जे आपले सहकारी आहेत तसेच वृद्ध नागरीक आहेत त्यांना यथोचित मदत करून मतदान करण्यास सांगा.

या वेळेसच्या निवडणूका ह्या थोड्या भिन्न आहेत. कारण ह्या निवडणूका साधारण ९ वर्षांनी होत असल्याने पुण्याच्या नागरीकात वेगळा उत्साह आहे. तसेच एक वैशिष्ट्य म्हणजे जे मागील निवडणूकीत ९-१० वर्षांचे मूले होते त्यांना या वेळेस मतदानाचा अधिकार मिळत आहे. त्यांना जागृत करणे हे आगळावेगळा नागरीक लाभ प्राप्त होत आहे त्यामुळे सुद्धा या निवडणूकीस महत्त्व प्राप्त झाले आहे.

**– मनोहर देशपांडे**
संचालक

***

# नियमित पान

**गे**ल्या काही अंकांपासून मी पर्यावरणाविषयी आपणाशी संवाद साधतोय. माझ्यामते पर्यावरण हा आपला अतिशय महत्त्वाचा आणि गांभीर्याने विचार करायला लावणारा विषय आहे.

काही दिवसांपूर्वी इराणची राजधानी तेहरानची बातमी आली. तेथे पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नद्या, तलाव, धरणे इत्यादी सर्व पाणीसाठे कोरडे होत चालले आहेत. दहा लाख लोकांना स्थलांतर करावे लागणार आहे.

हीच परिस्थिती जोहान्सबर्ग या दक्षिण आफ्रिका देशात झाली होती. तेथे पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य झाले होते आणि स्थलांतर करावे लागले.

या मागची कारणे काय असावीत ती तुम्हा आम्हाला माहित आहेत. पाण्याचा अतिवापर, भूजल मधील उपसा, पाणी साठवण्याची न वाढवलेली क्षमता अशी विविध कारणे आपल्या परिचयाची आहेत. प्रश्न एवढाच की आपण सर्वांनी या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करायचा की नाही.

याचे उत्तर ‘नाही’ असेल तर तेहेरान आणि जोहान्सबर्ग या शहरातील परिस्थितीसारख्या परिस्थितीला आपणा सर्वांना सामोरे जावे लागेल.

पण आपले ‘उत्तर’ होय असेल तर आपणा सर्वांना याबाबत स्वतःहून कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

गतवर्षी १००० मिलिमीटर होऊन जास्त पाऊस पुण्यात पडला. दरवर्षी पडणाऱ्या पावसाच्या सरासरीपेक्षा खूपच अधिक पाऊस पडला; परंतु सध्या टँकरने बऱ्याच ठिकाणी पाणीपुरवठा चालू आहे. पाणी मिळविण्यासाठी कूपनलिका खोदल्या जातात. त्यांची खोली दिवसेंदिवस वाढत चालली आहे. गत सप्ताहात एका चर्चासत्रात एका तज्ञ व्यक्तीने सांगितले की, ज्या ठिकाणी कुपनलिका ४०० फुटाहून अधिक खोदल्या आहेत त्या ठिकाणी हजारो वर्षापूर्वीचे साठलेले पाणी वापरण्यास सुरुवात झाली आहे.

अशा परिस्थितीत जमिनीमध्ये पावसाचे पाणी जिरविणे आवश्यक झाले आहे.

माझे सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना कळकळीची विनंती आहे की त्यांच्या संकुलातील इमारतींवर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची योजना करावी. त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. यासाठी फार मोठी यंत्रणा बसवावी लागत नाही किंवा मोठा खर्च करावा लागत नाही.

ज्या संस्थांना याबाबत मार्गदर्शन हवे असेल त्यांनी या क्षेत्रात भरीव कार्य करणारे कर्नल शशिकांत दळवी (मोबाईल नंबर – ९८६०५७७३६४) यांच्याशी संपर्क साधावा. ते निश्चितच मार्गदर्शन करतील. संस्थांनी असे प्रयत्न केल्यावर महासंघास जरूर कळवावे म्हणजे वास्तुदर्शन मध्ये त्याला प्रसिद्धी देता येईल.

आपल्या सर्वांच्या आणि आपल्या पुढील पिढीच्या हितासाठी सर्वांच्या सकारात्मक प्रतिक्रियांची अपेक्षा आहे.

मला विश्वास आहे की आपण सर्व योग्यती कार्यवाही करणार. धन्यवाद.

**– सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***

**–* निवेदन *–**

**सहकारी गृहरचना संस्थांशी संबंधित उत्पादने, सेवा, उपक्रम यांच्या जाहिराती वास्तुदर्शन मध्ये देण्यासाठी महासंघाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. (०२०-२४४५४०१०)**

**उदा. आर्किटेक्ट, प्लंबर, इलेक्ट्रिशियन, अकाउंटस् रायटींग, सोसायटी व्यवस्थापन, पाण्याच्या टाक्या धुणे, पेस्ट कंट्रोल, वॉटर प्रुफींग, हाऊस किपिंग, सिक्युरीटी सर्व्हिसेस.**

# संपूर्ण भारतातील आपत्कालीन हेल्पलाईन नंबर

| हेल्पलाइन नंबर | विभाग |
|---|---|
| १०० | पोलीस |
| १०१ | आग |
| १०२ | रुग्णवाहिका |
| १०३ | वाहतूक पोलिस |
| १०४ | आरोग्यासाठी राज्यस्तरीय हेल्पलाइन |
| १०८ | आपत्ती व्यवस्थापन/ वैद्यकीय हेल्पलाइन |
| ११२ | (दूरसंचार सामान्य आपत्कालीन विभाग (DoT)) |
| १३१ | भारतीय रेल्वे सामान्य चौकशी |
| १३९ | रेल्वे चौकशी |
| १८१ | घरगुती अत्याचार आणि लैंगिक हिंसाचार–महिला हेल्पलाइन |
| १९७ | निर्देशिका चौकशी सेवा |
| १९८ | टेलिफोन तक्रार बुकिंग |
| १०३१ | भ्रष्टाचार विरोधी हेल्पलाइन |
| १०३३ | राष्ट्रीय महामार्गांवरील आपत्कालीन मदत केंद्र |
| १०६६ | विषबाधा विरोधी |
| १०७१ | हवाई अपघात |
| १०७२ | रेल्वे अपघात |

| हेल्पलाइन नंबर | विभाग |
|---|---|
| १०७३ | रस्ते अपघात/वाहतूक मदत लाइन |
| १०९० | दहशतवादविरोधी हेल्पलाइन/ अलर्ट ऑल इंडिया |
| १०९१ | संकटात महिला हेल्पलाइन |
| १०९२ | भूकंप मदत लाइन सेवा |
| १०९६ | नैसर्गिक आपत्ती नियंत्रण कक्ष |
| १०९७ | एड्स मदत लाइन |
| १०९८ | बाल शोषण हॉटलाइन |
| १०९९ | केंद्रीय अपघात आणि आघात सेवा |
| १५५१ | किसान कॉल सेंटर |
| १९०६ | एलपीजी आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक |
| १९१० | रक्तपेढी माहिती |
| १९१९ | नेत्रदान/नेत्रपेढी माहिती सेवा |
| १९४७ | आधार कार्ड–यूआयडीएआय (भारताचा अद्वितीय ओळख प्राधिकरण), |
| १८००–१८०–१९४७ | |
| १९५० | निवडणूक आयोग भारत |
| १८००–११–४००० | |

# * सन २०२६ मधील महासंघ कार्यालयाच्या सुट्ट्या *

| | | |
|---|---|---|
| * **१४ जानेवारी** | (बुधवार) | – मकरसंक्रांत |
| * **२६ जानेवारी** | (सोमवार) | – प्रजासत्ताक दिन |
| * **३ मार्च** | (मंगळवार) | – धुलिवंदन |
| * **१९ मार्च** | (गुरुवार) | – गुढीपाडवा |
| * **१ मे** | (शुक्रवार) | – महाराष्ट्र दिन |
| * **२५ जुलै** | (शनिवार) | – आषाढी एकादशी |
| * **१५ ऑगस्ट** | (शनिवार) | – स्वातंत्र्य दिन |
| * **२८ ऑगस्ट** | (शुक्रवार) | – रक्षाबंधन |
| * **१४ सप्टेंबर** | (सोमवार) | – गणेश चतुर्थी |
| * **२५ सप्टेंबर** | (शुक्रवार) | – अनंत चतुर्दशी |
| * **२० ऑक्टोबर** | (मंगळवार) | – विजयादशमी |
| * **९ ते १४ नोव्हेंबर** | (सोमवार ते शनिवार) | – दीपावली |



स्टुडंड को-ऑपरेटिव्ह सोसायटी उद्घाटन, कुमार सबलाइम सह. गृह संस्था कोंढवा




स्टुडंड को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कोंढवा - दि. २७ डिसेंबर २०२५

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ सहमत असेलच असे नाही.

**मा. अध्यक्ष / सचिव**